# अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन

ग्रामीण कृषी मौसम सेवा, ए.एम.एफ.यु., इगतपुरी
विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी

**दूरध्वनी:** ०२५५३ २४४०१३ **ईमेल** – adr.igatpuri20@gmail.com

हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि.१३.०३.२०२०

जिल्हा: नाशिक

| मागील आठवड्यातील हवामान (०७.०३.२०२० ते १३.०३.२०२०) | | | | | | | **हवामान घटक** | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (१४.०३.२०२० ते १८.०३.२०२०) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०७/०३ | ०८/०३ | ०९/०३ | १०/०३ | ११/०३ | १२/०३ | १३/०३ | दिनांक | १४/०३ | १५/०३ | १६/०३ | १७/०३ | १८/०३ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० |
| २८.५ | २९.५ | ३१.० | ३१.० | ३०.५ | २८.४ | २७.५ | कमाल तापमान (अं.से.) | २९ | ३० | ३१ | ३२ | ३२ |
| १३.५ | ११.८ | १४.० | १४.० | १४.२ | १२.० | १३.२ | किमान तापमान (अं.से.) | १३ | १४ | १५ | १५ | १५ |
| निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | ढगाळ | अ: ढगाव | ढग स्थिती (आकाश) | निरभ्र | निरभ्र | अ: ढगाळ | अ: ढगाळ | ढगाळ |
| ८८ | ९२ | ८४ | ८४ | ८५ | ९० | ८६ | सकाळची सापेक्षआर्द्रता(%) | ७९ | ७६ | ७४ | ७२ | ७२ |
| ४२ | ४१ | ३१ | ३१ | ३३ | ५३ | ३० | दुपारची सापेक्ष आर्द्रता(%) | ४१ | ३८ | ३६ | ३६ | ३६ |
| ६.२ | ३.५ | ३.३ | ३.३ | ७.४ | ४.५ | ४.७ | वा-याचा वेग (किमी/ तास) | ८ | ११ | ८ | ७ | ५ |

## हवामान अंदाजावर कृषी सल्ला सेवा

| पिक | अवस्था | कृषी विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | पुढील पाच दिवसात हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे.तसेच कमाल तापमान २९-३२ डिग्री सें. व किमान तापमान १३-१५ डिग्री सें. दरम्यान राहण्याची शक्यता आहे तसेच वा-याचा वेग ५-११ कि.मी/.तास या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | १. शेतकर्यांना सल्ला देण्यात येतो कि पाण्याचा सुक्ष्म सिंचन पद्धतीचा उपयोग करून पाण्याचा कार्यक्षम वापर करावा.<br>२. ठिबक व तुषार सिंचन संचामधील गाळणयंत्रणा साफ कराव्यात. तसेच तोट्यानमधून पाणी बरोबर पडत असल्याची खात्री करावी.<br>३. मातीचे नमुने तपासणीसाठी मृदचाचणी प्रयोग शाळेकडे पाठवावेत.<br>४. काढणी झालेल्या पिकांची मळणी करुन सुरक्षीत ठिकाणी साठवणूक करावी.<br>५. उन्हाळी मुगाची पेरणी करावी. |
| संदेश | | उन्हाळी भुईमुगावरील पाने खाणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी एन रीलेयी@ ४० ग्राम किंवा एस.एल.एन.पी.व्ही.@ १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. |
| गहू | कापणी व मळणी | १. पिक तयार होताच वेळेवर कापणी करावी.<br>२. कापणीस उशीर झाल्यास एन आय-५४३९ व त्र्यंबक (एन आय ए डब्ल्यू-३०१) या गव्हाच्या वाणाचे दाणे शेतात झडू शकतात. म्हणून पिक पक्व होण्याच्या २-३ दिवस अगोदर कापणी करावी. |
| भुईमुग | वाढीची अवस्था | १. उन्हाळी भुईमुगावरील पाने गुंडाळणाऱ्या व पाने खाणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी इमामेक्टीन बेन्झोएट ५ एस.जी@ ४ ग्राम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.<br>२. उन्हाळी भुईमुगावरील पाने खाणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी एन रीलेयी@ ४० ग्राम किंवा एस.एल.एन.पी.व्ही.@ १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे<br>३. पेरणीनंतर नांग्या आढळून आल्यास बी टोकून ते ताबडतोब भरावेत.<br>४. १० ते १२ दिवसांच्या अंतराने २ ते ३ कोळपण्या कराव्यात व २ निंदण्या (खुरपण्या) द्याव्या.<br>५. पेरणीनंतर तणांच्या बंदोबस्तासाठी २०-२५ दिवसांनी परसूट किंवा टरगासुपर १५ मिली प्रती हे. प्रती १० लिटर पाण्यातून द्यावे. |

| | | |
|---|---|---|
| हरभरा | काढणी व अवस्था | १. हरभरा पिक ओलसर असताना काढणी करू नये. घाटे कडक वाळल्यानंतर मगच हरभऱ्याची काढणी करून मळणी करावी.<br>२. हरभरा पिक काढणी व मळणीनंतर धान्यास ६-७ दिवस कडक उन द्यावे.<br>३. कीड लागू नये म्हणून हरभरा कोठीत साठवणूक करताना त्यामध्ये कडूलिंबाचा पाला (५ टक्के) घालावा. |
| फळझाडे | | फळपिकांमध्ये पाण्याचे योग्य नियंत्रण करण्यासाठी शेतातील वेगवेगळ्या पिकांचे अवशेष (पालापाचोळा,गव्हाचा कोंडा, पाचट इ.) यांचे आच्छादन करावे. |
| द्राक्ष | फळ काढणी | द्राक्ष बागेतील पिठया ढेकणाच्या नियंत्रणासाठी व्हर्टिसिलीअम लेकॅनी ५० ग्रॅम + ५० मिली दुध प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. |
| ऊस | | उसामध्ये हुमणीच्या नियंत्रणासाठी खोल नांगरट करावी तसेच हुमणीच्या नियंत्रणासाठी परोपजीवी बुरशीसाठी मेटॅरिझियम अनीसोप्लि हेक्टरी ५ किलो शेणखतातून द्यावे. |
| आंबा | | १. वाढते तापमान व कोरडे हवामान लक्षात घेऊन आंबा झाडाना प्रति झाड १५० ते २०० लीटर पाणी १५ दिवसाच्य अंतराने द्यावे. व फळगळ कमी करण्यासाठी २० पीपी एम (PPM) (१ ग्रॅम ५० लिटर पाण्यात) नॅफ्थॉलिक ॲसेटीक ॲसिड (NAA) संजीवकाचे द्रावण मोहोरावर फवारावे.<br>२. आंबा पिकावरील तुडतुडे व भुरी नियंत्रणासाठी इमिडाक्लोप्रिड १७.८ एस एल@ ३ मिली + सल्फर ८० % डब्ल्यू पी@ २५ ग्रॅम १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करणे. |
| मिरची | | मिरचीवरील मावा किडीच्या नियंत्रणासाठी इमिडाक्लोप्रीड १७.८ % एस.एल. ५ मिली / १० लिटर पाण्यातून फवारणी करावी. |
| वांगी | | १. वांगीवरील तुडतुडे, मावा व पांढरीमाशी या किडींच्या नियंत्रणासाठी फॉस्पेमीडॉन ४० % एस.एल. १५ मिली किंवा फेनप्रोपॅथ्रीन ३० % ई.सी. ५ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून आलटून-पालटून फवारण्या कराव्यात. अधून-मधून ५ % निंबोळी अर्काची फवारणी करावी<br>२. वांगी पिकांवर कोळी आढळल्यास फेनप्रोपॅथ्रीन ३० % ई.सी ५ मिली किंवा डायकोफॉल १८.५ ई.सी. २५ मिली १० लिटर पाण्यातून फवारावे. |
| पशुसंवर्धन | | सर्व निरोगी जनावरांना लाळ खुरकत रोगाची प्रतिबंधक लस वर्षातून दोन वेळा (सप्टेंबर-मार्च) टोचावी. तसेच लागण झालेल्या जनावरांना इतर जनावरांपासुन बाजुला ठेवावे. |

**स्त्रोत:**

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई

2) मागील आठवड्यातील हवामान : ग्रा.कृ.मौ.सेवा, हवामान वेधशाळा, वि.कृ.सं.,केंद्र, इगतपुरी

ठिकाण : वि.कृ.सं.,केंद्र, इगतपुरी

दिनांक : १३.०३.२०२०

स्वाक्षरीत

प्रमुख अन्वेषक, ग्रा.कृ.मौ.सेवा, इगतपुरी तथा

सहयोगी संशोधन संचालक, वि.कृ.सं.,केंद्र, इगतपुरी